९८४३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५३७



वैदर्भीय

# क्रान्ति-गीतें

n.Shankar

REFBK-0006419
REFBK-0006419

प्रकाशकः—मा. द. देशपांडे

विदर्भ प्रांतिक किसान सभा अमरावती

किंमत १२ आणे

१०८३
दा.क्र.
६४१८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
पु. नं.
प्रगति वाचनालय
अ.क्र. १२०४

२९ मार्च १९४३ रोजीं
फांसावर चढलेल्या कय्यूर
हुतात्म्यांच्या स्मृतीस

—: समर्पण :—

हुतात्म्यांच्या नि दीनांच्या चितेच्या दिव्य ज्वालेंत
खाक होतील साम्राज्यें नि राज्यें जुल्मी श्रीमंत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. ६४९५
REFBK-0006419

क्रमांक

# अनुक्रमणिका

पृष्ठांक


समर्पणांतील पद्यपंक्ति-**शंकरराव दिघडे**

**साहित्यिक व साम्यवादी यांस**----

**दृष्टिक्षेप**—

कवि—**वियुक्त**

१ शारदेस .... .... १

२ दारिद्र्य व चारुता ... .... ४

३ ताज .... .... ६

४ ही कां ईश दया ? .... .... ८

५ पाथरवट ... .... १०

६ नको देव आम्हाला ! ... .... १२

७ टाका सर्व जुनें नवीन सगळें घ्या हो तुम्ही सर्वदा १४

८ आव्हान ... ... १५

९ किसान—कामगार गीत .... .... १७

१० किसानास— .... ... १९

११ किसाना, ऊठ ऊठ आतां ... ... २२

कविः—**बी. जी. भेश्राम** मंजूरसंघ कार्यकर्ता अकोला.

१२ रणीं डंका झडझडला .... ... २४

कविः—**गो. प. नन्नोरे,** किसान कार्यकर्ता चांदूर.

१३ लाल बावटा घ्या करीं ... .... २५

१४ आम्ही मजूर .... ... २६

.... कविः—**बा. न. देशपांडे** वरुड.

१५ आम्ही कष्टाचे शेतकरी रे .... ... २७

. कविः—**गो. प. नन्नोरे** चांदूर

१६ लुटून मजूरा होते भांडवल निर्माण .... २८

१७ मजूर राज्य स्थापण्यास व्हा तयार व्हा .... २९

| क्रमांक | | | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| १८ | आम्ही मजूरांची सत्ता कायम करूं | ... | ३० |
| १९ | काह्यचा मजूरांचा संसार | ... | ३१ |
| २० | एकजूट हें तुझे हत्यार .... | .... | ३३ |


## —: हिंदी–विभाग :—

रचयिता–**अमिरुद्दिन फकरुद्दिन**
कामगार विदर्भ मिल्स, एलिचपूर.


| | | | |
|---|---|---|---|
| २१ | तूं एं किरसान न बन नादान् | ... | ३४ |


रचयिता–**कमालशहा** तिवसा. डागडुजीवाला.


| | | | |
|---|---|---|---|
| २२ | गफलत को हटादो ... | .... | ३५ |
| २३ | आज एकहि झाड हो .... | .... | ३६ |
| २४ | लेनिन का तराना गावो .... | ... | ३७ |
| २५ | होशमे आवो गरीब .... | .... | ३८ |


रचयिता–**नरसिंग बालय्या** कामगार–मोहता मील अकोला


| | | | |
|---|---|---|---|
| २६ | लाल संघ .... | .... | ४० |


## प्रचलित संघ–गीतें


| | | | |
|---|---|---|---|
| २७ | क्रांतीचा जयजयकार .... | ... | ४१ |
| २८ | प्यारे हल चलाये जा ... | ... | ४२ |
| २९ | जंगे आजादी ... | .... | ४४ |
| ३० | लेनिन का वरदान ... | .... | ४५ |
| ३१ | हिंद तुझे आजाद करेंगे ... | .... | ४७ |
| ३२ | भव स्वतंत्रताका गान .... | ... | ४८ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१ । १०७
पु. नं. ता.
प्रगति वाचनालय

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६४९८
शाखा

## साहित्यिक व साम्यवादी यांस—

गेल्या एप्रिल महिन्यांत भाकना [ पंजाब ] येथील अखिल भारतीय किसानसभेच्या अधिवेशनाच्या निमित्ताने—किसान सभेंतील कांहीं बंगाली प्रतिनिधींशी विविध प्रश्नांची चर्चा करण्याचा सुयोग आला. त्यावरून बंगालच्या बौद्धिक जीवनांत कसा क्रांतीकारक बदल घडून येत आहे याची बरीच कल्पना आली. बंगालचे शास्त्रज्ञ, साहित्यिक व कलावंत, साम्यवादी विचारसरणीकडे अधिकाधिक झुकत आहेत. रशियांतील सांस्कृतिक प्रगतिबद्दल त्यांना विलक्षण आदर वाटतो व ते ' सोव्हिएट मित्रसंघ ' आदि संस्थांमधून साम्यवादी विचार-सरणीला पोषक अशा चळवळींत प्रत्यक्ष भाग घेत असलेले आढळून येतात. याच्या उलट परिस्थिती महाराष्ट्रांत आढळून येते. ता. ९ आगस्ट नंतर महाराष्ट्रीय साहित्यिक व साम्यवादी यांचे संबंध उत्तरोत्तर अधिकच दुरावत असल्याचे स्पष्ट दिसून आलें. ह्या परिस्थितीचे कारण काय असा विचार करीत असतां मला जी गोष्ट महत्वाची वाटली ती अशी कीं **साम्यवादी चळवळ** इतर प्रान्तात **किसानसभेच्या पुनरुज्जीवनाबरोबरच जोराने**

**वाढू लागलेली आहे; व या किसान चळवळीच्या अनुषंगानें अनेकविध कला व साहित्य यांचे** त्या प्रान्तात **पुनरुज्जीवन होत आहे.** महाराष्ट्रांतील किसान चळवळीचा अभाव हा तर महाराष्ट्रीय साहित्यिक व साम्यवादी यांच्या वाढत्या विरोधास कारणीभूत नसेल ना ! अशी मनांत शंका येई. परंतु असला दुरान्वयी संबंध लावणें तर्कशुद्ध विचारसरणीला पटणारें नव्हतें.

जेव्हां विदर्भ किसानसभेतर्फे प्रस्तुत क्रांतिगीतांचा संग्रह प्रसिद्ध करण्याचे ठरले आणि त्यांत संग्रहीत केलेल्या कवितांचा मी विचार करूं लागलो तेव्हां मध्यमवर्गीय कवींची ध्येयनिष्ठा आणि कामगार किसानांतील वास्तवता यांचा या संग्रहांत सुंदर मिलाफ झालेला पाहून माझी वरील शंका अधिकच बळावली. त्यावरून माझे असें निश्चित मत बनलें कीं **महाराष्ट्रसारस्वताचे पुनरुज्जीवन करण्याचें सामर्थ्य खरोखरच आजच्या किसानचळवळींत आहे** पण तिच्या अभावीच महाराष्ट्राच्या बौद्धिक व सांस्कृतिक जीवनांत गोंधळ माजला. व त्यामुळेंच कित्येक प्रतिगामी वाङ्मयीन व राजकीय प्रवृत्ती व प्रवाह महाराष्ट्रांत रुजू पहात आहेत. हा निश्चित निष्कर्ष काढण्यास मला आज कोणताहि प्रत्यवाय दिसत नाहीं. व या संबंधी विस्तृत विवेचन करण्याचे हें स्थळ नसले, तरी महाराष्ट्रीय साहित्यिक व साम्यवादी यांचे विचारार्थ हा मुद्दा थोडक्यांत मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. वस्तुतः महाराष्ट्रीय साहित्याचे स्थान इतर हिंदी भाषांत निःसंशय बऱ्याच वरच्या

दर्जाचें असून महाराष्ट्रीय सहित्यिकांची परंपराहि प्रगतिशील अशी राहिलेली आहे. दैनिक वृत्तपत्रीय साहित्यांत आढळून येणारा उथळपणा व थिल्लरपणा यावरून कोणत्याहि साहित्यासंबंधी निश्चित स्वरुपाचे निष्कर्ष काढणे चूक आहे. **एखाद्या भाषेंतील साहित्याचें मूल्यमापन करतांना त्यांत कोणत्या प्रवृत्तींना प्राधान्य आहे हें प्रथम ठरविले पाहिजे.**

या दृष्टीनें १९३१ नंतरच्या काळांतील मराठी साहित्यांतील प्रवृत्ती व प्रवाह जरी अंधुक आणि अस्पष्ट असले तरी त्यांची दिशा निःसंशय पुरोगामी होती हें कोणालाहि नाकारता येणार नाहीं. हे प्रवाह अस्पष्ट, अंधुक राहिले हा कांहीं सर्वस्वी महाराष्ट्रीय कलावंतांचा दोष नाही.

महाराष्ट्राच्या विशिष्ट आर्थिक परिस्थितीमुळें मध्यमवर्गीय साहित्यिकांना कामगार चळवळीच्या क्रांतिकारक ध्येयाचे आकलन होऊं शकले नाही. **या ध्येयाची वास्तवता ध्यानांत येण्यास कामगार चळवळीशीं, मध्यमवर्गाला जोडणारा किसान चळवळीचा दुवा येथे नव्हता.** त्यामुळें मध्यमवर्गीय कलावंतांनी त्या ध्येयाला भुतदयेचे स्वरूप दिले, कित्येकांनीं आपल्या प्रणयी कथाकरितां त्या ध्येयाची पार्श्वभूमी रंगविली. या प्रवृत्तींचें पुरोगामी महत्व लक्षांत न आल्यामुळें आत्यंतिक ध्येयवादाने पछाडलेल्या कामगार चळवळीतील साम्यवाद्यांनी मध्यमवर्गावर जोराचे हल्ले चढविले. त्याचा **परिणाम असा झाला कीं ज्या ध्येयाची छाप महाराष्ट्रीय साहित्यिकावर अंधुक**

**व अस्पष्टपणे पडत होती त्याला स्पष्ट स्वरुप देण्याऐवजी ते साम्यवादी, राष्ट्रीय चळवळीप्रमाणें साहित्यापासून अलगच राहिले,** आणि आज साहित्यिकांना उद्देशून त्यांना असे स्पष्टपणें म्हणावे लागले कीं, “ बाबांनो, कामकऱ्यांच्या आणि शेतकऱ्यांच्या वाटेस जाऊं नका. ” नवीन ध्येयाची वास्तवता न अनुभविलेल्या मध्यमवर्गीय साहित्यिकां-समोरील जुनी ध्येयें दारुण वस्तुस्थितीसमोर कुचकामीं ठरलीं. उच्च आणि ‘ उदात्त ध्येयाच्या ’ **ब्रह्मचाऱ्याला** तरुणीच्या बाहुपाशांतच स्वर्गीय आनंद असतो अशी जाणीव ते करून देऊं लागले. आणि समाजसेवेची घमेंड मारणाऱ्या तरुणींना आपल्या प्रियकराची ‘ **पायाची दासी** ’ होण्यांतच जीवनाची सार्थकता आहे असें ते पटवूं लागले.

याचा परिणाम असा झाला कीं, ध्येयनिष्ठ महाराष्ट्रांतील बुद्धिजिवी मध्यम वर्ग एकतर ध्येयशून्य बनला किंवा मिरासदार वर्गाच्या प्रतिगामी राजकारणाचे जोखड खांद्यावर घेण्यास, सिद्ध झाला. बुरसटलेल्या धम, समाज, संस्कृतीच्या कल्पनांचें महाराष्ट्रीय राजकारणांत जे विशेष प्रभुत्व दिसतें तें या परिस्थितीचेच निदर्शक नाहीं कां ? अशा परिस्थितीत “ कलावंताने जनतेशी समरस झालें पाहिजे ” एवढ्या घोषणावजा संदेशानें काम भागणार नाहीं; कारण उपलब्ध व आधुनिक महाराष्ट्रीय साहित्यांत जनेतच्या जीवनाचें जिवंत चित्र उभे केलेले आढळून येतेच ना ! मुख्य प्रश्न आहे तो

ग्रंथसंग्रहालय ठाणे

हा कीं:—कलावंत कोणत्या ध्येयाशीं समरस झालेले आहेत ? कला ही सामाजिक क्रिया असून कलावंत हा परिस्थितीनें घडविलेला आहे. तेव्हां या प्रश्नाचें सरळ उत्तर हेंच कीं, ज्या वास्तवतापूर्ण ध्येयाशीं तो विचाराने आणि भावनेनें समरस होईल त्या ध्येयाला पोषक अशी कलाकृती त्याचे हातून निर्माण होईल हें निश्चित. बंगाल, आंध्र, केरळ, पंजाब या प्रांतातून केवळ साहित्याचेच नव्हे तर नृत्य संगीत आदि अनेकविध कलांचे पुनरुज्जीवन होत आहे व हें पुनरुजीवन राष्ट्रीय चळवळीतील सांस्कृतिक पुनरुज्जीवनाहून निःसंशय भिन्न आहे. याचे कारण हेंच कीं, कामगार वर्गातील अत्यंत पुरोगामी ध्येय, राष्ट्रीय व परंपरागत अशा प्रतिकांच्या साह्यानें किसानाना समजावून सांगावी लागत आहे. आर्थिक व राजकीय संबंधाप्रमाणेंच कामगार किसान वर्गाचे सांस्कृतिक संबंध निर्माण करावे लागत आहेत. शेतकरी जसजसा या नवीन ध्येयाभोंवती गोळा होऊं लागेल, व कामगारांच्या नेतृत्वाखाली किसानांची चळवळ जसजसी वृद्धिंगत होत जाईल तसतसे किसान वर्गाशी सर्वदृष्ट्या निगडीत असेलल्या मध्यम वर्गातून उत्तमोत्तम साहित्यिक जन्माला येतील व या दोन्ही वर्गातून उत्कृष्ट साहित्य उदयास येईल.

किसानचळवळीचे सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या दृष्टीने महत्व हेंच ! महाराष्ट्राला मुंबईच्या कामगार वर्गाची लढाऊ,

पुरोगामी परंपरा आहे. या कामगारांचा ' लाल बावटा ' खेडोपाडी किसानांच्या आवारांत फडफड उडत राहिला तर महाराष्ट्रांतील सर्व प्रतिगामी वृत्तींचे तो निर्दालन करील, तद्वत् साहित्यिक आणि साम्यवादी यांचेमध्यें सुरुं असलेली लाथाळी बंद होईल व दोघांच्या सहकार्यानें हिंदुस्थानच्या आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक प्रगतीला महाराष्ट्राच्या ध्येयनिष्ठेचा, चिकाटीचा व बुद्धिवादाचा भरपूर उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं.

माधव द. देशपांडे
सभासद
मध्यवर्ती किसान कौन्सिल
अखिल भारतीय किसान सभा.

---

# दृष्टिक्षेप

आशा मुद्रण,
अमरावती.

प्रिय महाशय—

यांस,

घरीं येतांच आपण प्रसिद्ध केलेला वैदर्भीय क्रांतिगीतांचा संग्रह टेबलावर ठेवलेला आढळला. मलपृष्ठावरील उपण्याचे चित्र अर्थवाही, नाविन्यपूर्ण व स्थलसूचक आहे यांत शंकाच नाहीं. पुस्तकाची बांधणी आटोपशीर व वापरलेला टाईप सुटसुटीत व सुबोध असल्यामुळें तो चित्ताकर्षक झाला आहे, व यांचें सर्व श्रेय आशा प्रिन्टिंग्ज्चे उत्साही व्यवस्थापक श्री. द. रानडे यांना देणेंच श्रेयस्कर. मुद्रण दोष कदाचित् असतीलही पण आंबेमोहोरांतसुद्धां खडे सांपडतातच ना! पुस्तकांत मराठी व हिंदी पद्यें घातलेलीं असून कांहीं संघगीतांचाही समावेश करण्यांत आलेला आहे. मराठींत संघगीतें फारच कमी. तीं पुष्कळ व्हावयास पाहिजेत. या बाबतींत बंगालप्रांत बराच पुढारलेला दिसतो.

अलीकडे काव्याची निपज पुष्कळ होत असली तरी ती वाचण्याची प्रथा बरीच कमी झालेली दिसून येते. याला कारणें काय घडलीं असतील तीं असोत पण मासिकांत प्रसिद्ध केलेल्या कवितांना त्यांच्या जनकाशिवाय प्रेमानें गोंजारणारा इतर कोणी भाग्यवंत क्वचितच आढळतो. पण हें ओळखूनच कीं काय आपण या गीतसंग्रहांतील महत्वाच्या पद्यपंक्ती जाड टाइपांत छापलेल्या दिसतात. त्यामुळें जरी ओझरती दृष्टी फेकली तरी-देखील गीतांचा भाव लक्षांत येतो, मन वेधलें जातें व पुस्तक सहजासहजी डावलतां येत नाहीं. सध्याचें युग धावतें आहे. सारीच धांदल. युद्धनीति देखील विद्युत्‌वेगाची, तेव्हां युगधर्म लक्षांत घेऊन यांत केलेली ही योजना प्रकाशकाच्या चातुर्याची साक्षच पटविते. मी तर असें म्हणतों कीं सध्याच्या मध्यम वर्गांतील सुशिक्षित प्रौढ स्त्रिया आपल्या

घरी येणाऱ्या वर्तमानपत्रांतील महत्वाच्या बातम्यांवर खुणा करून याप्रमाणें ठेवतील तर त्यांच्या शिळोप्याच्या गप्पांस आळा बसेल व कचेरींतून थकून येणाऱ्या पतिराजांच्या सहवासांत बराच काळ घालविण्याची संधीं त्यांना प्राप्त होऊन त्यांचा स्वतःचा बौद्धिक दर्जा वाढेल व पतिराजांची ' क्लब हॅबिट् ' पण सुटेल.

जाड टाइपांतील पद्यपंक्तींनीं मनाचा ठाव घेतला व रॉकेल तेलावर नियंत्रण असताना देखील सारी रात्र मी हा गीतसंग्रह वाचून काढला.

## वैदर्भीय वाङ्मयाची परंपरा

वैदर्भीय लेखकांनीं जरी वारेमाप वाङ्मयनिर्मिती केली नसली तरी पण जी कांहीं त्याचे हातून घडली किंवा घडत आहे ती भरीव आहे हें निश्चित. वाङ्मयांतील पुढारीपण विदर्भानें अजून सोडलें नाहीं. ज्या विदर्भांत आदिकवि मुकुंदराय यानें पयोष्णेच्या काठीं महाराष्ट्रसारस्वताचा मळा पिकविला व अध्यात्माचे उमोप पीक काढलें त्याच विदर्भांत किसान कामगारांची चळवळ निर्माण होतांच वैदर्भीय क्रांतिगीतें निर्माण झालीं व गूढगुंजनवादी वैदर्भीय काव्याचा ओघ वास्तवतेच्या प्रशांत सागराकडे वळला.

वाङ्मय निर्माण होण्याला प्रथम परिस्थिति निर्माण व्हावी लागते. काममोहित क्रौंच मिथुनावर जर व्याधाचा बाण पडला नसता तर वाल्या कोळ्याच्या आर्त स्वरांतून ओजस्वी काव्य निर्माण झालें असतें का ? परसत्तेचे आघात महाराष्ट्रावर होतांच कटेवर हात ठेविलेल्या विठ्ठलाला अहिंसेचें व्रत सोडून देऊन कोदंडधारी रामाचें स्वरूप घेण्याचा अट्टाहास समर्थांनी धरला व ' देव तो यत्न जाणावा ' असा ओजस्वी संदेश नैराश्यवादी, हतबल झालेल्या, निश्चेष्टपर महाराष्ट्रास त्यांनीं आपल्या

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६४९८
शाखा (स्थळ)



# शारदेस

मिळेना मला पुष्प पत्री सुगंधी
कराया तुझे गे जगीं पूजन
गव्हा तांदळाची नसे सोय माझ्या
घरीं जाहलो मी पुरा निर्धन
कशी वाट चालूं अशा रिक्त हस्तीं
तुझ्या मंदिराची मला सांग ना
भिकारी तुझा भक्त येईल कैसा
तुझ्या मंदिरा आज गे दर्शना ? ॥ १ ॥

तुझ्या अंगणीं झाड सारस्वताचें
जरी लाविती मोठमोठे कवी
फळें गोमटी शुद्ध चाखावयाला
नरांना मिळेना परी या भवीं
क्षणाचा विसावा जिवाला मिळेना
करावें कसें गे तुझें पूजन ?
पदाब्जीं तुझ्या भृंग गे मानसाचा
कसा देवि जाईल गे रंगुन. ? ॥ २ ॥

सारस्वताच्या योगानें दिला. तो कां ? बुरसटलेल्या सामाजिक परिस्थितीची चीड आल्यामुळेच **केशवसुतानी** गोफण फिरवीत फिरवीत व एका हातांत नव्या युगाचें ' नवें निशाण ' घेऊन ' **तुतारी** ' फुंकत फुंकत ' रूढीचीं बंधनें तोडा ' असा सणसणीत संदेश महाराष्ट्रास दिला. रँडसाहेबाचा खून, लोकमान्यांचा मंडालेचा तुरुंगवास, सावरकरांची जन्मठेप व चाफेकर बधूंची फांशी इत्यादि रोमांचकारी राजकीय प्रकरणें निर्माण होतांच स्वातंत्र्यशाहीर **गोविंदाची** राष्ट्रीय कविता निर्माण झाली. सारांश, परिस्थितीच वाङ्मय निर्माण करते हेंच निःसंशय.

अशीच परिस्थिति विदर्भांत निर्माण झाली व त्यामुळेंच ही क्रांतिगीतें निर्माण झालीं आहेत. सद्यपरिस्थितीचें तिवशाचे कामगारकवि कमालशहा, यांनीं केलेलें वर्णन पहा.

चावल्, गेहूं, जवारी भी, तूंवर के दाल का
बढते गया है भाव जो, हरएक माल का ।
भाई का खून पीने को, भाई तुला है आज । १

**तांबा और पीतल बेचकर, खाली है घर पडे ।**
**बाकी रहा न कुछ भी तो खाते है बरबडे ।**
**खाये न जानवर भी, वो खाने मिला है आज । २**

हें वाचून कोणत्या स्थितप्रज्ञाचें चित्त पिळवटून निघणार नाहीं ? सहृदयी माणसाला एक तर बुद्ध झालें पाहिजे, किंवा बोल्शेव्हिक तरी झालें पाहिजे, कष्ट करून उपासमार, काम करण्याची इच्छा असताना तें मिळण्याची मारामार, संतती-नियमनाप्रमाणें यंत्राच्या उत्पादनशक्तीवर नियंत्रण, बहुसंख्यांक श्रमजीवी लोकांना, नफेबाजीच्या अट्टाहासानें, नागवण्याची सत्ताधिकाऱ्यांची अधम तृष्णा, ज्या समाज रचनेंत उत्पन्न झाली तींत आमूलाग्र बदल करावयास पाहिजे, असे त्यांना वाटल्यास नवल तें काय ? परिस्थितीचें अवलोकन व तिचा अनुभव

यावरूनच माणसे आपले विचार बनवितात. तेव्हां सद्यपरिस्थितीचा विचार करताना मूठभर भांडवलदारांनींच सध्याच्या समाज-रचनेचे आर्थिक धोरण ठरविलेलें आहे हें लक्षांत येण्यास वेळ लागत नाहीं. या भांडवलशाही समाजरचनेंत भांडवलदार व मजूर असे दोन परस्परविरोधी पक्ष निर्माण होणें अपरिहार्य आहे.

त्यांचे यथार्थ स्वरूप कळावे म्हणून शारदेच्या पूजनांत कवी म्हणतो—

**जगीं माजली वर्गसत्ता तियेचें, जनीं नागडें रूप तें दाविन।**
**रूढीच्या झुगारुनिया बंधनातें मुदें क्रांतीचा मंत्र मी गाईन॥**

समाजांत वर्गसत्ता ही कोणत्याना कोणत्या तरी स्वरुपामध्यें अस्तित्वांत होती व आहे. तिचें स्वरूप मात्र उत्पादनसाधनावर अवलंबून असतें. याचा दाखला पौराणिक कालांतून देखील देतां येण्यासारखा आहे. वशिष्ठ विश्वामित्र या ब्रह्म व क्षात्र वीरांचा धेनुहरणासंबंधीचा झगडा याच स्वरूपाचा होता. कारण नंदिनी ही वशिष्ठाची कामधेनू होती, उपजीविकेचें साधन होतें व तेंच आपल्या ताब्यांत असावे असा विश्वामित्राचा तो हरण करण्यांत हेतु होता. एकलव्यासारख्या किराताचा आंगठा तोडून टाकण्यांत आपल्या वृत्तीला ढळ बसूं नये याशिवाय अर्जुनाचा दुसरा कोणता हेतू असावा बरें? यावरून वर्ग विरोध हा पूर्वापार चालत आलेला आहे असेंच आपणाला दिसून येईल. ही वर्गसत्ता किसान कामगारांच्या राज्यांतच नष्ट होऊं शकते व वर्गविरहीत समाज किसान कामगारच स्थापन करूं शकतात असा दुर्दम्य आत्मविश्वास सोव्हियट रशिया व चीन यांच्या उदाहरणानें उत्पन्न झाला व आपण सर्व संघटित व्हावयास पाहिजे ही जाणीव त्यांच्यांत उत्पन्न झाली. जातीय, राष्ट्रीय व धार्मिक कुंपणें ओलांडून या नवीन शास्त्रशुद्ध तत्वज्ञानानें भारलेले हे किसान "इन्किलाब झिंदाबाद" चा जयघोष करीत लाल झेंडयाखालीं संघटीत होऊन स्वयं-स्फूर्तीनें आपल्या हक्कांची दाद मागण्याकरितां सनदी नोकरांच्या कचेऱ्यावर

मोर्चे काढू लागले. पोटाची आग त्यांना स्वस्थ बसूं देईना. जमिनदार पद्धतीची त्यांना चीड आली व दास्यत्वाची त्यांना शिसारी बसली.

एलिचपूरचा कामगार कवि अमिरुद्दीन म्हणतो.—

जमींदार करते है ऐश तेरे सहारेपर।

है खेती उनकी कायम फकत् तेरे सहारेपर।

'अमीर' आबाद है दुनियामे सब उनके सहारेपर।

बिगड जायेंगे ये सब काम एक उनके इषारेपर ॥ १ ॥

त्यांच्या भावना उचंबळून आल्या व त्यांच्या खळखळणाऱ्या उत्कट भावनांतूनच हीं गीतें बाहेर पडलीं. त्या प्रत्येक गीतांत स्फुल्लिंग आहे. प्रत्येक गीत जळजळीत निखारा आहे, चटके देणारा आहे. हे विझलेले कोळसे नव्हत व हीं गीतें रचणारे लेखणी पण नाहींत. यांचा किसान चळवळीशीं प्रत्यक्ष संबंध आहे. आर्थिक व सामाजिक विषमतेचे चटके त्यांना जीवनांत पदोपदीं बसत आहेत पण हंसत मुखानें या साऱ्या यातना सहन करून त्या क्रांतिदिनाची ते चातकाप्रमाणे वाट पाहात आहेत. लब्धप्रतिष्ठित व पर्यंकपंडित समाजाने उपेक्षिलेल्या, किसानांची हीं गीतें आहेत. या गीतांत शब्दांचे मार्दव नसेल, व्याकरणाची शुद्धता नसेल, साहित्यांतील अलंकार नसतील पण अंत:करणाचा उमाळा आहे, भावनांचा खळखळाट आहे, शब्दांचा ओज आहे, भविष्यातील दुर्दम्य आशावाद आहे व म्हणून ही गीतें जिवंत काव्य आहेत.

या गीतांच्या मळ्यांत प्रवेश करताना जातीय व्यक्तिधर्माला मूठमाती द्या.—

पेडतो आती नजर एक एक से दुनिया बनी।

आखरी दिन आगये आज एकही झाड हो ॥

असा ओजस्वी संदेश देणाऱ्या श्रमजीवी पाखरांचे मधुर आलाप कानीं येतात. मोटेच्या संदोरावर बसून, 'काद्यचा गरिबाचा संसार' विचार करणारा किसान विचारतंद्रींतून जागा होऊन.—

ऐ किसान तूं न बन नादान्

खुदको पैछान, क्या है तेरी शान !

असें मोठ्या आवेशाने हातवारे करीत गातांना त्याच्या ललकाऱ्या कानावर येताच मध्यमवर्गीय कवींना आपले हितसंबंध याच वर्गाशीं निगडीत झाले आहेत असा आत्मविश्वास वाटून ते देखील सारस्वताची साथ देऊं लागतात.

हीं गीतें वाचून माझ्या मनावर हा परिणाम झाला. मी हीं गीतें पुरोगामी वाङ्मयाचें निदर्शक आहेत किंवा नाहीत असला वितंडवाद करूं इच्छित नाहीं. मानव समाजरचनेचा विकास कसकसा होत गेला हें, अभ्यासणाऱ्या विचारवंताच्या सहजच लक्षांत येईल कीं सरंजाम शाहीच्या कुशींतूनच भांडवलशाही निर्माण झाली व भांडवलशाहीच्या कुशींतूनच साम्यवाद जन्माला येत आहे. तेव्हां साम्यवादाला पोषक असेच प्रवाह व प्रवृत्ति पुरोगामी होत हें स्पष्टच आहे. या प्रवृत्ती ज्या वाङ्मयांत दिसून येतात तें सर्व पुरोगामी, असें म्हटल्यास वादाचा प्रश्नच नाहीं. जी किनाऱ्याला येऊन पोहोचेल तीच लाट या संज्ञेस पात्र, नाहीं तर पाण्यांत झालेल्या इतर तरंगांना तरंगच म्हणावयाचे नाही, हा अट्टाहास कां ? या दृष्टीने महाराष्ट्रवाङ्मयांत पुरोगामी वाङ्मयाचे प्रवाह, आपटयांच्या बरोबर थांबले नाहीत किंवा लालजी पेंडसे बरोबर सुरुही झाले नाहीत उलट ते अखंड चालूच आहेत. परिस्थिती निर्माण झाली, समाजाची मूल्यें बदललीं की तदनुरुप वाङ्मयातील मूल्येंही बदलतात. वहात्या पाण्याबरोबर काठ नाही कां आपोआप निर्माण होत ? त्याचे ऐवजी मातीचे पेंड लावण्याचा खुळा प्रयत्न कोणी करील कां ? असल्या तऱ्हेचा किसान क्रांतिगीताचा अभिनव संग्रह आपण माझेकडे पाठविला याबद्दल आपले आभार मानून लेखणीस विराम देतों.

आपला

★★★

तुवां निर्मिले प्राणिमात्रास साऱ्या
रमाया पहा विश्व क्रिडांगण
कसा वास दु:खास तेथें मिळावा ?
— रणाचे नसे खास तें अंगण
'भरावा सदा मोद आयुष्यपात्रीं
सुखाचीं फुलें तोडुनी या जनीं'
तुझा दिव्य संदेश हा घालविला
विषाची नरें लावुनी लावणी. ॥ ३ ॥

तुझीं पंचभूतें नरा सौख्य द्याया
अहोरात्र तीं राबतीं या जनीं
परी कोंडुनी आत्मगेहीं तयांना
पहा ! ठेविताती जगीं या धनी
नरानी नरालाच गे नागवूनी
सुखाचें दिलें पात्र लाथाडुनी
भवीं या कसें स्वास्थ्य लाभेल जीवा
मला सांग गे तूझिया पूजनीं ? ॥ ४ ॥

खरा भाव केला तुझ्या व्यक्त पायीं
मना साक्ष ठेवोनिया गे अतां

करूं पूजनाची कशी सिद्धता मी
मना जोंवरी ना मिळे स्वस्थता ?
तुझ्या पंचभूतास गे सोडवूनी
जनांच्या करी गे तया स्वाधीन
सुखाचे करी द्वार गे मुक्त आई
कराया जगीं गे तुझें पूजन. ॥५॥

निराशा कुणाच्या मनीं ठाव देई
कुणी दीनवाणी करी प्रार्थना
प्रियेच्या उरीं ठेवुनिया शिरातें
कुणी वर्णिती तारकांच्या गुणा
**जगीं मातली वर्गसत्ता तियेचें**
**जनीं नागडें रुप तें दाविन**
**रुढीच्या झुगारूनिया बंधनातें**
**मुदें क्रांतिचा मंत्र मी गाइन ॥६॥**

# ★ दारिद्र्य व चारुता ★

मित्रा ! हृदयीं तुझ्या लाविली आग कुणी सांग
चंचल लोचन ते कोणते सांग मला सांग
अंबाड्यावरचें चुकूनी तूं फूल सुंगिलें कां ?
सुवास पुष्पांचा अंतरी मस्त तुला करि कां ?

किंवा रमणीचें गान तव हृदयांतूनि भिनलें ?
अमृत समजूनी तूं हलाहल वा प्राशन केलें ?
संचित का मित्रा कसा तव प्रेमभंग होई
इच्छिशी काय जगीं सुहृदा मनिषा वद पाही

* * *

भाव अंतरीचा सांगतों सख्या मनोभावें
अभद्र वच माझे क्षमेला पात्र असूं द्यावे
हृदयी पेट घेई दाह तो प्रणयाचा नाही
सौंदर्या बघता निराशा ठाव मनी देई !

सुंदर युवतीचे बघोनी हावभाव सारे
मन व्याकुळ होई आमुचे जीवन शोकभरे
नीटनेटकी ती बघोनी तिची केशरचना
दृष्टी पुढे येती दरिद्री कितीतरी ललना

पुष्पांचा गजरा    जयांच्या शोभे वेणीवरी
किती हिंद युवती    वाहती मणमण भार शिरी
पाणीदार डोळे    मोहिती अपुल्या प्रेमी जना
निर्जल नेत्रांची    असे कां कुठें तरी गणना ?

झिर झिर त्या शाल्ल    मधोनि गौर अंग चमके
गरिबांच्या चिंध्या    मधोनी दिसे भाग्य फुटके
मुखांतुनी ज्यांच्या    निघावे कोमल वेणू ध्वनी
अभद्र वच त्यांचे    सदोदित येती मम कानीं

बागेतील फुलें    उन्हानें सुकोनिया जाती
दारिद्या बघता    चारुता अपुला मार्ग धरी
पाणी सिंचोनी    तयांचे प्राण पुन्हा यावे
**अंतरीची मनिषा    तयांचा बागवान व्हावे !**



# ताज

कुणी बांधिला ताज हा वैभवाचा ?
शहानें कधीं वीट कां ठेविली ?
कुणी ओतली सर्व कारागिरी ही ?
कुणाला परी कीर्ति ही लाभली ?
गुलामापरी राबवोनी अम्हाला
प्रियाराधनीं नागविलें जनीं
करोनी स्तुती त्याचिया वैभवाची
जगानें अम्हा ठेविलें डांबुनी

पहा जाऊनी एकदां त्याजमागें
दिसे लोकगंगा तुम्हा अश्रुची
पहा ! फोडिते सारखा दीर्घ टाही
तुम्हा सांगते वंशजाची स्थिती
तणारे परी आमुचे पाडुनीया
दिलें हाकलोनी अम्हाला भुवीं
प्रियेची जरी सांगताती समाधी
नसे ती परी आमुची या जगीं

कलेची असे साक्ष ती आमुच्या या
जगीं आज आम्ही असूं कोण ते

कलोपासनेचे खरे हो पुजारी
अम्हावांचुनी अन्य कोणी नसे
**न मुमताज तेथें न वा प्रेमवेडा**
**शहा नांदतो राजवाड्यांत या**
**हजारो अम्ही अर्धपोटी पुजारी**
**परी राहतो हो समाधींत या**

अडाणी अम्ही सत्य सांगावयाला
कुठूनीं मिळे भाट हे लक्ष्मिचे
कथा आमुची कोण ऐकावयाला
कुठूनी मिळे छाप ते आजचें ?
विपर्यास तो सांगुनी अर्भकांना
दुहीचीं भुतें नाचविती जगीं
स्वतःचा जगीं स्वार्थ साधावयाला
इथें घेतले आमुचे हो बळी

उठा बांधुनी कंबरा शीघ्र आतां
पुरे जाहली वंचना आपुली
कुणाचा जगीं स्वार्थ साधावयाला
अम्ही देऊ ना आमुचे हो बळी
समाधीस ह्या ठेवुनी साक्ष आतां
झटूं या क्षणीं तोडण्या शृंखला
**'अम्ही विश्वकर्मे जगीं अर्धपोटी'**
**जगाच्या पुढें ठेउ हा दाखला !**

# ताज

कुणी बांधिला ताज हा वैभवाचा ?
शहानें कधीं वीट कां ठेविली ?
कुणी ओतली सर्व कारागिरी ही ?
कुणाला परी कीर्ति ही लाभली ?
गुलामापरी राबवोनी अम्हाला
प्रियाराधनीं नागविलें जनीं
करोनी स्तुती त्याचिया वैभवाची
जगानें अम्हा ठेविलें डांबुनी

पहा जाऊनी एकदां त्याजमागें
दिसे लोकगंगा तुम्हा अश्रुची
पहा ! फोडिते सारखा दीर्घ टाही
तुम्हा सांगते वंशजाची स्थिती
तणारे परी आमुचे पाडुनीया
दिलें हाकलोनी अम्हाला भुवीं
प्रियेची जरी सांगताती समाधी
नसे ती परी आमुची या जगीं

कलेची असे साक्ष ती आमुच्या या
जगीं आज आम्ही असूं कोण ते

कलोपासनेचे खरे हो पुजारी
अम्हावांचुनी अन्य कोणी नसे
**न मुमताज तेथें न वा प्रेमवेडा**
**शहा नांदतो राजवाड्यांत या**
**हजारो अम्ही अर्धपोटी पुजारी**
**परी राहतो हो समाधींत या**

अडाणी अम्ही सत्य सांगावयाला
कुठूनीं मिळे भाट हे लक्ष्मिचे
कथा आमुची कोण ऐकावयाला
कुठूनी मिळे छाप ते आजचें ?
विपर्यास तो सांगुनी अर्भकांना
दुहीचीं भुतें नाचविती जगीं
स्वतःचा जगीं स्वार्थ साधावयाला
इथें घेतले आमुचे हो बळी

उठा बांधुनी कंबरा शीघ्र आतां
पुरे जाहली वंचना आपुली
कुणाचा जगीं स्वार्थ साधावयाला
अम्ही देऊ ना आमुचे हो बळी
समाधीस ह्या ठेवुनी साक्ष आतां
झटूं या क्षणीं तोडण्या शृंखला
**'अम्ही विश्वकर्मे जगीं अर्धपोटी'**
**जगाच्या पुढें ठेउ हा दाखला !**

# ★ ही कां ईश दया ? ★

' डोळयांनी बघतों, ध्वनी परिसतों कानीं पदीं चालतों
जिव्हेनें रस चाखतों, मधुरही वाचें आम्ही बोलतों ।
हातानें बहुसाळ काम करतों, विश्रांति ही घ्यावया
घेतों झोंप सुखें फिरोनी उठतों ही ईश्वराची दया ॥ १ ॥

शाळेच्या चिमण्या जगांत असतां हा श्लोक मी वाचिला,
साध्या बालमनास अर्थ पटला, आनंदही वाटला ' ।
आतां कां परि अर्थशून्य रचना ही वाटली हो मला ?
सारासारविवेकशक्ति पुढतीं आनंद अंधारला ? ॥ २ ॥

डोळयांनीं बघतों जगीं विषमता, कानीं सदा ऐकतों–
रंकांना लुटुनी धनीं निजहितां त्यांना भुकें मारतों ।
हातांनी बहुसाळ काम करुनी पोटा न खाया मिळे
ही कां ईशदया जगांत वसते देवा तुझ्या ? ना कळे ॥ ३ ॥

**ईशें निर्मियली समाजरचना कीं मानवांनीं बरें ?**
**झालें कारण काय ही घडविण्या ? यांतील जाणा खरें**
**आम्ही निर्मियली समाजरचना, हा देव कीं पाहुणा**
**त्याची भाकुनिया जगांत करुणा, पावेल का कामना ? ॥४॥**

उद्यानीं लतिका अहा ! बहरतां ! ओंब्या गव्हां लागतां
सांगा श्रेय कुणास तें ? श्रमजिवी लोकांस ना तत्वता ?
देव्हाऱ्यांत बसून क्षेत्रहि कधीं नाहीं जिनें पाहिलें
कां त्या ईशकृपेस श्रेय भलतें देता तुम्ही रे खुळे ? ॥ ५ ॥

सौख्याचा ध्वज या जगीं उभविणें, हें मानवांच्या करीं,
अज्ञेयांस नका महत्व जगतीं देऊं वृथा भूवरीं ।
सारासार विवेकदीप हृदयीं ठेवा सदा तेवत
सौख्याचा नच मार्ग अन्य जगतीं क्रान्तीविना निश्चित ॥ ६ ॥

# पाथरवट

कुणी कोरली मूर्ति ही पंढरीची
कुणाचा तिथे भात्र हा रेखिला
कुणाची पहा रक्त–बंबाळ बोटें
छनीचा असे घाव त्या बैसला

अधू जहाली दिव्य दृष्टी कुणाची
कुणी ओतलें रक्त पाण्यापरी
कधी जहाली कां स्मृति त्या नरांची
तुम्हां ज्ञानवन्ता जगी यापरी ?

**कलेचे पुजारी दिले हाकलोनी**
**लुटोनी तयांची खरी जिंदगी**
**महाद्वार तें घेतले लावुनिया**
**धनी नागवीती तयांना जगीं**

× × ×

तरुच्यातलीं ठाण मांडून प्राणी
पहा बैसला नागडा सांवळा
कपाळावरी स्वेद बिंदू तयाच्या
उन्हाच्या तया लागताती झळा

छनी घेवुनी वाम हातांत हाणी
हतोडा तियेच्या पहा हा शिरी

तडाख जरी बैसती ते चिपांचे
शरीरावरी खंत ना त्यापरी

२

उठे भाव त्या फत्तरी अंतरीचा
बघोनी तया मोद होई अती
चुकोनी जरी घाव हातावरी ये
तया मानसीं वाटते ना क्षिती

करी व्यक्त तो भावना त्या मनींच्या
हतोडा तयां फत्तरीं मारुन
मनांतील देवत्व हें कोरुनीया
इथ ठेविलें ओतुनी जीवन

३

**हिरावोनिया घेतली मूर्ति त्याची**
**दिला हाकलोनी तरूंच्या तळी**
**बसे नागडा अर्धपोटी उपाशी**
**रहाया न त्याला कुठें झोपडी**

**कलेचा पुजारी दिला हाकलोनी**
**लुटोनी तयाची खरी जिंदगी**
**महाद्वार तें घेतलें लावुनीया**
**धनी नागवीती तयांना जगीं**

अज्ञानाच्या अंधारांत, निराशेच्या काळोखांत

देव करी वास तेथे बाळ पोचला ॥ ७ ॥

देवरुप बाळ पाही, संतापाने लाल होई

घालवाया दूरी त्याते सज्ज जाहला ॥ ८ ॥

देवभक्त होता तेथे, त्यानें शिरीं केला वार

घावा सरशी शूर बाळ, धरणीतें आला ॥ ९ ॥

माता धावोनिया आली आसवांची माळ केली

घाली गळा बाळाच्या ती बाळ घालीना । देव बाळा दिसेना ॥१०॥

म्हणे माते इच्छा एक, ' लावी येथें आशा ज्योत

पाजळोनी ज्ञानदीप, हाकी देवाला

नको देव आम्हाला ' ॥११॥

# नको देव आम्हाला

देव दिसेना, देव दिसेना । आई, सांग कोठे मसी देव दिसेना

*　　*　　*

बाळ कर दोन्ही जोडी 'देवबाप्पा' वदे जरी । मनामध्ये शंका परी
देव इथे ना ॥ १ ॥

' देव दगडाचा का ग ? विश्व त्याने केले का ग ?
हालचाल केली त्यानें कशी कळेना ' ॥ २ ॥

' सूर्यचंद्र तारागण, देव असती बाळा जाण
चालविती विश्वचक्र, तया अंत ना ' ॥ ३ ॥

' सूर्यचंद्र तारागण, ग्रह असती सारे जाण
तया अंगीं देवपण, मुळी असेना ' ॥ ४ ॥

' बाळा धर्मशास्त्रे वाची मग उमजशी साची
तया माजी विश्वरुप । पाही एकदा ' ॥ ५ ॥

×　　×　　×

बाळ धर्मशास्त्रें वाची, मग उमजला साची
तया माजी म्हणे बाळ देव पाहिला
बाळा देव दिसला ॥ ६ ॥

अज्ञानाच्या अंधारांत, निराशेच्या काळोखांत

देव करी वास तेथे बाळ पोचला ॥ ७ ॥

देवरुप बाळ पाही, संतापाने लाल होई

घालवाया दूरी त्याते सज्ज जाहला ॥ ८ ॥

देवभक्त होता तेथे, त्यानें शिरीं केला वार

घावा सरशी शूर बाळ, धरणीतें आला ॥ ९ ॥

माता धावोनिया आली आसवांची माळ केली

घाली गळा बाळाच्या ती बाळ घालीना। देव बाळा दिसेना ॥ १० ॥

म्हणे माते इच्छा एक, 'लावी येथें आशा ज्योत

पाजळोनी ज्ञानदीप, हाकी देवाला

नको देव आम्हाला' ॥ ११ ॥

## टाका सर्व जुनें नवीन सगळें
## घ्या हो तुम्ही सर्वदा.

लागे कीड अहा! समाज तरुला पुष्पें फळें कोठुनी
येती रम्य तयास आज मग तीं सांगा मला ना जनीं ?
पाण्याच्या मग घातल्या बहु जरी मूळावरी घागरी
सांगा काय तयास ही टवटवी येईल कां ? हो तरी ? ॥ १ ॥

टाका तो उपटूनि आज सगळा जाळा तया भूवरीं
द्या फेकोनि नदींत राख सगळी ती ! दग्ध प्रेतापरी
टाका नांगरुनी जमीन सगळी भाजूनिया चांगली
लावा रोप नवें तगेल मग तें, होतांच क्रान्ती भली ॥ २ ॥

**जाळा ती तुमची समाजरचना निःसत्व झाली अतां**
**जातां प्राण घरांत कां मग कुडी तुम्ही कधी ठेवितां ?**
**हातानें मग ज्या तुम्ही निजमुलां प्रेमांत गोंजारता**
**त्याची बांधुनिया तुम्हीच तिरडी ना पेटवितां चिता ?॥३॥**

मोहा आवरूनी, नवीन जगता स्थापावया कारणें
जाळा सर्व जुनी तुम्हा प्रिय जरी हीं संस्कृतीतोरणें
क्रांन्तीच्या उदरींच अभ्युदय हें जाणा तुम्ही हो तदा
टाका सर्व जुनें नवीन सगळें घ्या हो तुम्ही सर्वदा ॥ ४ ॥

# आ व्हा न



घेउनि तरुण राष्ट्राचा । चालला ॥
स्वातंत्र्य समर भूमीला । ठाकला ॥
बावटा लाल [illegible] । रोविला ॥
[illegible]नी मात[illegible]वरण
[illegible]करी आव्हान
हिंद – वीरा
राष्ट्राच्या गुण [illegible]रा । तरुण हो ॥ १ ॥

हो मुसलमान हिंदू वा । कोणीहि ॥
फारसी ख्रिस्ती यहुदी वा । जातिनी ॥
गाडुनि दुही – वेताळा । या क्षणी ॥
रक्तांत रक्त मिसळून
हिंदी म्हणवून
घेउ आतां
शौर्याची लाल पताका । उज्वल ॥ २ ॥

स्वातंत्र्य गुढी येवोनि । थबकली ॥
चीनच्या भव्य भिंतीला । ठाकली ॥
व्हा सज्ज तिला भेटाया ! मंडळी ॥
तातडी करुनि या घडी।
शिपाई गडी
जमा सारे
स्वातंत्र्य स्फूर्तिचे वारे । वाहती ॥ २ ॥

व्यक्तिच्या देव धर्माला । विसरुनी ॥
जातिच्या देव धर्माला । विसरुनी ॥
शपथ घ्या हिंद तरुणांनों । या क्षणीं ॥
उद्धरूं मातृभूचरण
हाच मम धर्म
देव जाणा
राष्ट्रीय वृत्तिचा बाणा । उज्वल ॥ ४ ॥

# किसान-कामगार. गीत.

वृत्त-चामर

चला उठा चला उठा करांत लाल बावटा
घेउनी लढ्यांत या पडा सुखार्थ रे ! झटा ॥
हार ना तुम्हा कधींही बाळगा खरें मनीं ।
कामगार वा किसान सर्व रे झटा जनीं ॥ १ ॥

राहावया न झोपडी, मुलें गरीब नागडीं ।
राबतात गा मळ्यांत अर्धपोटि बापडी ॥
ग्यान नाहीं त्राण नाहीं सौख्य नाही जीवनीं ।
कामगार वा किसान सर्व रे झटा जनीं ॥ २ ॥

वावरांत राबतां उन्हांत सर्वदा जरी ।
जप्त जिंदगीही होत, वायदा थके परी ॥
रक्तशोष चालवा जगांत राव माजला ।
ओळखून डाव हाच वीर हो पुढें चला ॥ ३ ॥

अन्नवस्त्र त्याजला मिळेल कष्टवी जिवा ।
हक्क हा असे तयांस हें मनांत जागवा ॥
ऐतखाऊ बैसती घरांत सौख्य भोगती ।
गरीब ते पहा कसोनि वावरांत राबती ॥ ४ ॥

पेरणी करील शेत तोच होय मालक ।
ऐतखाऊ राव ना जगांत होति पालक ॥
वावरांत राबती, शरीर कष्ट सोसती ।
कामगार वा किसान मालकी तयां क्षिती ॥ ५ ॥

**चला उठा ! चला ! करीं धरूनि कोयता ।**
**कामगार व किसान एक होवुनि अतां ॥**
**गुलाम राहूं ना कधीं गुलाम होउं ना कधीं ।**
**हो स्वतंत्र ! करुं स्वतंत्र ! मायभूमि ही अधी ॥ ६ ॥**

# कि सा ना स

कां उभे घेऊनि हाती
फाळ आणि नांगर
राबता शेतांत त्यांच्या
नागवीती जे नर
कष्टवूनि या शरीरा
का विणीतां कापड
ठोकरीती जे तुम्हाला
भूषवीतां तें धड
देउनीया अन्नवस्त्रा
कां तयांना पोषितां
देउनीया त्यांस पैसा
कां उपाशी राहतां
घाम छे! हें रक्त तुमचे
प्राशुनी आकंठ रे
ऐतखाऊ पांखरें हीं
भटकती विश्रांत रे
शृंखला चाबूक आणि
कां हत्यारें घडवितां ?

घेवुनी ही लूट सारी
मारिती तुम्हां अतां

*　　　*　　　*

लाभली कां रे जिवाला
सौख्य शान्ती या जनीं
आसराही प्रेमळांचा
कां विसावा जीवनीं
सोसुनीया कष्ट नाना
काय ही संपादणी
'भारवाही' जाहलाना
हाय ! रे ही जाचणी
पेरतां शेतांत तुम्ही
पीक घेती अन्य रे
निर्मितां देशांत पैसा
बाळगीती कोण रे
वस्त्र जे तुम्ही विणीतां
ऐतखाऊ वापरी
निर्मिता शस्त्रें विषारी
अन्य तीं हातीं धरी
राबती शेतांत जे कां
भाकरी त्यांची असे

निर्मिती राष्ट्रांत पैसा
भोग त्याचा तो असे
कापडाची वीण ज्यांची
मालकी त्यांची खरी
निर्मितातीं जे हत्यारा
रक्षणातें भूवरीं
ऐतखाऊ आळशाचा
हक्क नाहीं त्यावरी
होउ दे जाणीव त्यांना
तूं किसाना या परी
तोडुनीया शृंखला ह्या
होइ तूं रे मोकळा
कापती हे स्वार्थसाधू
अज्ञ जीवांचा गळा
कोयता हातीं धरुनी
फाळ हा खांद्यावरी
टाक तूं पाऊल आतां
मोचनाच्या संगरीं
शृंखला पायांत तुझ्या
या विना कांहींच नाहीं
संगरीं स्वातंत्र्यवीरा
मुक्तता होईल पाही

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ६४१८

# ★ किसाना, ऊठ ऊठ आतां ★

( चाल:—सबसे राम भजन कर लेना. )

चल घे लाल ध्वजा करी आतां। किसाना ऊठ ऊठ आता ॥धृ॥

जप्त जाहली तुझी जिंदगी घर ना दार तुला।
सावकार हा लुटुनी तुजला करि अब्रुवरि घाला।
किसाना ऊठ ऊठ आतां ॥ १ ॥

कष्ट करुनिया रातभऱ्याचे नच भाकर पोटा।
बाइल उघडी पोरें उघडी चिंधीचा रे तोटा। किसाना ॥ २ ॥

सूट मिळेना पै-पैशाची सरकारी दरबारीं।
मायबाप ते ओळखितीना तुम्हांला अविचारी। किसाना ॥ ३ ॥

स्वार्थाची ही दुनिया सारी कोण कुणाचा नाही।
सामर्थ्याची जाणीव तुजला होऊं दे यावेळीं। किसाना ॥ ४ ॥

वऱ्हाडचा तूं शेतकरी ना मिंधा नाहीं कुणाचा।
सामर्थ्याची जाणीव आपुल्या होऊं दे साचा। किसाना ॥ ५ ॥

**फाळ टाकुनी खांद्यावरती चाल पुढे आता।**
**पोटाचा रे लढा तुझा हा लढणें त्याच्याकरितां।**
**किसाना ॥ ६ ॥**

दौलत गेली अब्रू गेली उरले काय आतां ।
गुलामगिरीचा चाळा पायीं, गेला तोही आता किसाना ॥ ७ ॥

सामर्थ्याची तुझ्या कल्पना होती धनिकाला ।
ढोंग धत्तुरें या धनिकांचे जातिल रे विलयाला । किसाना ॥ ८ ॥

लढतों आम्ही पोटासाठीं मत्सर नाहीं कुणाचा ।
ऐतखाऊं जे पिकूनी काढिती त्याचा नाहीं दुजांचा ।
किसाना ॥ ९ ॥

**भिक्षा नाहीं कुणा मागणें हक्क अह्मां गरिबांचा ।**
**" कष्ट करावे त्यानें खावें हाच न्याय दुनियेचा ।"**
**किसाना ऊठ ऊठ आतां ॥ १० ॥**



# रणीं डंका झडझडला

रणीं डंका झडझडला मजूरा चल धावत लढण्या ॥ धृ० ॥

भूक शमविण्या हक्क मिळविण्या बंधु तुझे लढले
अगणित सांडुनी रक्त जगावर लाल ध्वज फडकविला ॥ १ ॥

**बेकारी दारीद्र्य उपासा मूठमाती दिधली**
**जूल्मी भांडवलशाही मिटवूनी जगा मार्ग दर्शविला ॥ २ ॥**

रशिया हा पोलादी किल्ला मजूर किसानांचा
नाझी फॅसीस्टानी अचानक केला त्यावर हल्ला ॥ ३ ॥

लाल ध्वजाचे लाल शिपाई रणांगणीं लढती
मायभूमीच्या अब्रूसाठी मोल जीवाचे देती ॥ ४ ॥

लाल ध्वजाचा शूर शिपाई तूं बेहोश कसा
दंड थोपटी रणमैदानी चल लोळव शत्रूला ॥ ५ ॥

**नाझींचा कर नाश चुराडा कर फॅसिस्टांचा**
**होऊन विजयी जगीं फडकू दे मानी लाल ध्वजाला ॥६॥**

रणीं डंका झडझडला मजूरा चल धावत लढण्या ॥ ७ ॥

क्रमांक: ६
ठाणे ग्रंथ संग्रहालय ठाणे नं. प्रगति वाचनालय

# लाल बावटा घ्या करीं ॥ धृ० ॥

लाल बावटा घ्या करीं ॥ धृ० ॥

लाल बावटा मजुरांचा । दर्शक त्यांच्या रक्ताचा ॥
फडकव त्याला जगावरी । लाल बावटा घ्या करीं ॥ १ ॥

पिकविती जगती अन्ना कोण । कष्टति जगतासाठीं कोण ॥
मजूर आणि शेतकरी । लाल बावटा घ्या करीं ॥ २ ॥

संघ शक्ती मजुरांची । दावी रशिया दलितांची ॥
हटवी फौज हिट्लरी । लाल बावटा घ्या करीं ॥ ३ ॥

नाझींचा नायनाट करा । फॅसिष्टाचा करा चुरा ॥
घ्या उडी जनसंगरी । लाल बावटा घ्या करीं ॥ ४ ॥

**नव्या जगाला निर्मूं आपण । एक होऊनि सारे जण ॥**
**स्वर्ग आणू भूवरीं लाल बावटा घ्या करीं ॥ ५ ॥**

ठाणे ग्रंथ संग्रहालय ठाणे नं. प्रगति वाचनालय

## आम्ही मजूर आम्ही मजूर, मजूर क्रांतीचे।

आम्ही मजूर आम्ही मजूर, मजूर क्रांतीचे ।
घ्या, म्हणतो शस्त्र हातीं लोकयुद्धाचे ॥ १ ॥
आम्ही मजूर, आम्ही मजूर, मजूर शेतीचे
करा म्हणतो निश्चित तुम्हा भाव धान्याचे [कपड्याचे] ॥
फार थोडी, मजुरी मिळे भाव वाढले ।
घेणे आम्हा शक्य नाही उपास पातले ॥
कपडा नाही चटके लागे, अंगास उन्हाचे ॥ १ ॥

नफेबाजी वाढून गेली तेज सर्वची ।
भाकरीवरी आम्हा न मिळे खावया मिरची ।
हाल आम्ही सांगतों आज देशाचे ॥ २ ॥

**भाव करा निश्चित आतां धान्य कपड्याचे ।**
**दाखवु बळ जपानला आम्ही आमच्या शक्तीचे**
दूर नाही, स्पष्ट दिसे आदर्श चीनचें ॥ ३ ॥

आम्ही मजूर शत्रू असू जपान नाझीचे ।
इच्छा आमुची दहन होओ फॅसिष्ट–तत्वाचे ।
द्या आम्हा शस्त्र हाती लोकयुद्धाचें ॥ ४ ॥

# आम्ही कष्टाचे कष्टाचे शेतकरी रे ।

आम्ही कष्टाचे कष्टाचे शेतकरी रे ।
करुं काम, काढूं घाम घेऊ राज हाती रे । धृ०

धान्याची रास झाली सावकारानं लुटुन नेली
चोट्यांची जप्ती आली । घरावरी रे । १

बाजारांत तेजी झाली । मजुरीला मंदी आली
पाण्यावरी रात गेली । गांवा मंदी रे । २

**धान्याचे भाव रोखा । नफेबाजीला डांबर फासा**
**हत्यारांची मांग करा । देशा मंदी रे । ३**

जपानाशी मोका आला लाल बावट्याचा पुकार झाला
सावकार घाबरुन गेला खेड्यामंदी रे । ४

हिट्लरला उत आला रशियावर चालून गेला
किसानांनी उभा चिरला दारामंदी रे । ५ । आम्ही

## लूटून मजुरा होते भांडवल निर्माण ।

लूटून मजुरा होते भांडवल निर्माण ।
त्यानाच खाण्या नाहीं जाई जरी प्राण ।
करितात मौजा ऐदी लोडाशी झोपून ।
छळतात मजुरा भारी रक्तास पिऊन ।
तूंही अतां, मजुरा, घे तलवार हक्काच्या साठीं दे प्राण । १
झालेत दिडशें वर्ष पारतंत्री आपण ।
गेलेत फाशी बंधू ठेऊनि आठवण
खडतर तयांचे भारी दु:खीच जीवन
चळवळ करी आतां तयाकरितां, अन् जीवाचा लाव तूहि पण । २
लढतात हक्कासाठीं मजदूर रशियांत ।
फॅसीस्ट क्रूरांची कत्तल ते करतात ।
नाझी, जर्मनांचे हातीं कित्येक मरतात ।
करुनि कावा गनिमी नुकसान करतात ।
तूहि तसा कामगार, हो तैयार कटविण्याला मान । ३
चल बांध कंबर आता भीतीस सोडून
घेई शपथ क्रांतीची हो पुढं हिमतीनं ।
घेईन बदला आता रक्ताचा रक्तानं ।
देईन बदला आता गोळीचा गोळीन ।
घेई करी बावटा, जगी समता चल स्थाप आतां
रक्त देऊन । ४

# मजुर राज्य स्थापण्यास व्हा तयार व्हा !

[ ब्यांडच्या चालीवर ]

मजुर राज्य स्थापण्यास व्हा तयार व्हा ।

अन्न पिकवि कोण ।
वस्त्र विणत कोण
मजुर आणि शेतकरी कष्ट करी पहा । १

मजुर राज्य स्थापण्यास व्हा तयार व्हा ।

फॅसीस्ट ते,
नाझी क्रूर हे
नागविती लोक सकल या जनीं पहा । २

मजुर राज्य स्थापण्यास व्हा तयार व्हा ।

झाडुं गोळीला,
दावुं शक्तीला–
देऊ रक्त, देऊं प्राण गर्जूनी महा ।३

मजुर राज्य स्थापण्यास व्हा तयार व्हा ।

# आम्ही मजुरांची सत्ता कायम करुं । ध्रु० ।

ऐदीपणाची रीत फार दुष्ट
पडतात मजूराला दिनरात कष्ट
मौजा करीती ऐदी पोटभरु ॥ १ ॥

इतिहास रशियाचा आम्हाला दिसतो
मार्क्स–लेनिनचा उपदेश कळतो
अतां लाल झेंडा हाती धरुं ॥ २ ॥

फॅसिष्ट दुष्टांचा झाला सुकाळ
नाझी तसा तो आपणाला काळ
काळांचे काळें आपण करुं ॥ ३ ॥

आदर्श जगाची करुं स्थापना
रमू प्रीतिनें नंदनवना
आला काळ त्याला कधी ना डरुं ।
आम्ही मजुरांची सत्ता स्थापन करुं ॥ ४ ॥

# * काह्यचा मजुराचा संवसार *

[ वऱ्हाडी गीत ]

किती कष्ट करनार ?
काह्यचा मजुराचा संवसार ॥

निंदन खुरपन् बाइल करते
वाह्यतों नागर, डवरे मी ते
अर्ध्या पोटा भाकर मियते
आनिक, किती खपनार
काह्यचा मजुराचा संवसार ॥ १ ॥

ऊन कळकळ वरूतुन तपते
भुई भाजते पाऊल आमचे
उपास जायते पोट आमचे
काह्याच काम करनार
काह्यचा मजुराचा संवसार ॥ २ ॥

जमीनींमंदी पेराव आमी
रात दिसाच त्याऽत खपुनी
आयत खाव धनवंतानी
मरे – कस्ट करनार
काह्यचा मजुराचा संवसार ॥ ३ ॥

घरांदारांतील संमदे खपतों
लक्तर, वाकयी पर पांघुरतों
चैन चोचला कुठला सुचतों
मजूरी कुट पुर्नार
काह्यचा मजुराचा संवसार ॥ ४ ॥

सट्वीनं काय कपाई लिह्यलं
बरह्मानं काय तीस सांगितलं
किती वर्साच जिनं आपलं
देव कधी नेनार
काह्यचा मजुराचा संवसार ॥ ५ ॥

× × ×

समाज रचनेची ही खाई
एक उपाशी, दुसरा खाई
गरिबाचे बळी कितीक घेई
कधीं शांत होणार
काह्यचा मजुराचा संवसार ॥ ६ ॥

# एकजूट हें तुझे हत्यार

या या न्यायाचे धनी !
मातृभूमीचे या ऋणी
ऋण फेडाया व्हा तयार !
एकजूट हें तुझे हत्यार – १

नेत्यांची करण्याला सूट !
धर्म जातीची मिटवी फूट
जनशक्ती हा तुझा आधार !
एकजूट हें तुझे हत्यार–२

संकट सर्वांवरी असे !
जगण्या जवळी या कसे
समान संकट करण्या ठार !
एकजूट हें तुझे हत्यार–३

**फॅसिझमचा घुःघुत्कार !**
**जनसूर्यानें पळेल पार**
**कर जनयुद्धाचा स्वीकार !**
**एकजूट हें तुझे हत्यार–४**

# तूं ऐ किरसान न बन नादान्

तूं ऐ किरसान, न बन नादान,
खुदको पैछान, क्या है तेरी शान !
जानते है कि [1]रिश्क तो [2]किस्मत् मे लिखा !
क्या [3]मयस्सर नही हो सकता गुलामी के सिवा ।
क्या नही जानते किस तरहसे [4]हांसील होगा ।
[5]फन् कोई सीखीये, या सीखीये कोई पेशा । तूं । १
[6]गौर कर इस बातपर करता है तूं काम क्या ।
और [7]ऐवज मे मिलता है तुझे दाम क्या ।
और तुझे मिलता है उस दामसे आराम क्या ।
शायद [8]फ़ाकेहिसे गुजरेगी ये तेरी [9]शाम क्या । तूं । २

**हरी खेती दुनियामें जहांतक नजर आती है ।**
**हवा चलती है ठंडी और जब वह लयलहाती है ।**
**तो पत्ती पत्ती खुष होकर यह [10]मिसदा सुनाती है**
**हमारी [11]परवरीश करना ये किरसानोकि छाति है ।** ३

जमींदार करते [12]ऐष है तेरे [13]सहारेपर ।
है खेती उनकी कायम फकत् तेरे सहारेपर ।
[14]'अमीर' आबाद है दुनियामे सब उनके सहारेपर ।
बिगड जायेंगे ये सब काम एक उनके इषारेपर । ४

---

1 हिस्सा. 2 नशिब. 3 प्राप्त होणें. 4 मिळणे 5 कला. 6 विचार कर. 7 मोबदला. 8 उपास पोटी. 9 संध्याकाळ 10 संदेश. 11 सेवा. 12 चैन. 13 आधारावर 14 कविचे नांव.

# -: गफलत को हटादो :-

गफलत को हटादो गरीबो, दिन भला है आज
दुश्मन को मिटादो गरीबो मन जला है आज।
दिनरात मेहनत करकरके, [1]रत्ती खो दिये।
चरणों पें [2]शीस धरधर के, खाने मिला है आज। गफलतका।१

चावल्, गेहूं, जवारी भी, तूंवर के दाल का
बढते गया है भाव जो, हरएक माल का।
भाई का खून पीने को, भाई [3]तुला है आज। गफलत को। २

**तांबा और पीतल बेचकर, खाली है घर पडे।**
**बाकी रहा न कुछ भी तो खाते है [4]बरबडे।**
**खाये न जानवर भी, वो खाने मिला है आज।**
**गफलत को। ३**

कहना शरम है भाईयो, हालत की [5]बेकशी
कपडे का भाव बढने से [6]मुर्झा गयी खुशी।
भाई तो क्या मां बहनो का, सब तन खुला है आज। गफलत को।४
सुनलो गरीबो किसानो ये, 'चालाख' कह रहा
**सीधे [7]सगर को छोडकर आफत को सहे रहा**
**मरने पे [8]मायल रहो फुला फला है आज। ५**

---

1 स्वधन. 2 डोके 3 सिद्ध. 4 एक प्रकारच्या शेंगा.
5 असाहता 6 सुकून जाणें. 7 रस्ता. 8 सिद्ध.

# आज एकहि झाड हो

भाई यों हर शाखसे, कहे दो, कि एकही झाड हो
है कोई दिन की [1]जुदाई, आज एकही झाड हो । १

**काँग्रेसीयोंसे कह दो, और मुस्लीम लीगसे ।**
**फूट दुष्मन जान लो, आज एकही झाड हो । २**

**काट डाला पत्ते, डाली, फूल, फल, [2]कुलहाड से**
**तोड दो [3]नस्तर को जहरी, आज एकही झाड हो । ३**

आरती मंडलभी, संघ हो, [4]याके दल, उनसे कहो—
एक से बेकी बनी हो, आज एकही झाड हो । ४

खाकसारोंसे भी कह दो, भाईयो आवो इधर
रासता एकीका चलकर, आज एकही झाड हो । ५

[5]पेड़ तो आती नज़र, एक् एक् से दुनिया बनी
आख़री दिन आगये, आज एकही झाड हो । ६

भूलकर बैठे है हर एक्, [6]क़ौम बस् [7]चालो चलन्
कहे रहा 'चालाक् चिल्ला,' आज एकही झाड हो । ७

1 फूट. 2 कुऱ्हाड. 3 मूळांत कीड लागलेली मुळी.
4 या शिवाय. 5 झाड. 6 जात. 7 आचारविचार.

# लेनिन का तराना गावो

सोतेको अब तो जगावो । लेनिन का तराना गावो
अय भूखे गरीबो आवो । लेनिन का तराना गावो १

रोटीको रोवे बच्चा । कहे हाल ये किसको सच्चा
सुनता है जो उसको सुनावो । लेनिन का तराना गावो २

हम होगये कैसे येडे । हर एक शहरमी खेडे
सर अक्ल दिमाग़ घुमावो । लेनिन का तराना गावो ३

है कष्ट के करने वाले । उनपरभी आफत डाले
जुल्मत् को सरसे हटावो । लेनिन का तराना गावो ४

तन सुखा है मेहनत करके । मन जल गया अबतक डरके
नी कष्टको नष्ट बनावो । लेनिन का तराना गावो ५

हम [1]सब्र कहांतक खाये । फॅसिस्टोने सर को उठाये
सुलगी है जो आग बुझावो । लेनिन का तराना गावो ६

एक, जुल्म है हमपर शाही । [2]तरसाते है खानेको भाई
तिसरी ये [3]बला मे न पावो । लेनिन का तराना गावो ७

उजडे हुये घर को बनावो । रोते है जो उनको हंसावो
'चालाक़' ये क्रोध मिटावो । लेनिन का तराना गावो ८

1 शांत. 2 तळमळू लागले आहेत. 3 संकट.

# होशमे आवो गरीब

होशमे आवो गरीब बेहोश [1]मंतर होगये ।
आजतक भी गफ़लतोंसे हाल [2]अबतर होगये धृ० ।

देखलो अंधेर शाही को अंधेरे मे यही ।
कोई खाय हलवा मलाई और न आटा है कही ।
भूके पेटों पे मुनाफे बाजियोने सर उटा
आयगी जिस दिन घडी, घर [3]ज़र कही और वो कही ।
तेल था पीपेमें पीपा फिर तो [4]झत्तर होगयें । होशमे । १

**हम गरीबोंने अभीतक [5]आहका [6]नारा न कर, ।**
**भाजिपाले को मिला आटेमे की उसपर गुजर ।**
**फटगई टोपी उपरसे धूपमे रहता है सर ।**
तन खुला है मन जला कष्टोंसे देखो [7]सर बसर
क्या अमीरो के तनोमे मन ए पथ्थर होगये । २

छायेगी एकदिन उदासी सारे दुनियापर जरूर ।
है खबर हरिएक को फिर भी न कम होता [8]गरुर ।

---

1 बधीर 2 दुर्दशा 3 पैसा 4 टिनाचे तुकडे 5 सुस्कारा
6 घोषणा 7 पूर्णपणे 8 अहंकार

ये तो जग जाहीर है कि सबको एकदिन मरना पडे
फिरभी जालीमोकी जुल्मत दिलसे होती है न दूर
**कोई बना मख्खी [9]शहदकी, हम तो मच्छर होगये । होशमे ।३**

सोचला ए [10]शहदखोरो मूं को मीठा कर लिया ।
अच्छा अच्छा खाके सारापेट भारी कर लिया ।
**आगई सुस्ती तुम्हे हरकाम की इन्साफ के ।**
**[11]इल्म ठगनेकाहि सीखा मुल्कमे अंधेरा करदिया ।**
**कुछ न देखा मच्छरोंने खून पीकर खोगये । होशमे ।४**

क्या खुदान ये जमीं है किसके नामे करदिया ।
आंस्मांसे या कहीं से आके किसको [12]जर दिया ।
जो जो बसते है यहांपर एकसा हकदार है ।
**जालिमोनें [13]जुल्म ढाकर खूब झोली भर लिया ।**
**जब फटे 'चालाक' झोली सब [14]इकंदर होगये । होशमे । ५**

---

9 मध. 10 मध खाणारांनो. 11 कला. 12 पैसा.
13 जुलूम करून. 14 सारखे.

# लाल संघ

फॅसिस्टोंका करने खातमा बनासंघ है जनताका ।
दुनिया भरमे करने क्रांति हुवा जंग यह जनताका ।
जब हिटलरने गले दबांये यूरपमे सब राष्ट्रों के ।
बढते चले थे दुनिया भरमे लाल सिपाहि ' लेनिन ' के ।
खुद जर्मनीमें देखा हिटलरने, लाल संघ है जनताका
फॅसिस्टोंका । १

रुसपें धांवा बोल दिया हिटलर जैसे बेमानोने
हात बटाया अपने देशमे वहां मजदूर किसानोंने,
बूढे और जवानोने ।
चिनी जनताको सात बरस तक सताया है जपानोने
इसमे रतिभी झूट नही है सुना आपके कानोने
इन चोरोंको भगा रहा है जहा संघ है जनताका। फॅसिस्टोंका।२

मार खाके जब चला जपानी भारतपर चलकर आया
सिंगापूर, मलाया, बर्मा ले आगे बढकर आया
**ऐ भारतवालो उठो उठो, अपने द्वारे आया खूनी**
**चीनमे ठंडी हुई है थोडी, यहां अब करना है दुनी**
**करना राज है दुनियाभरमें इसी जंगमे जनताका ।**
**फॅसिस्टोंका । ३**

# क्रांतीचा जयजयकार



फाके विजयी रक्तोषा । जी एक रशियांत
ती आमची, स्वातंत्र्येच्छा । मूर्त प्रकाशीत
तूंही, श्रमिक युवका । सामील लाल् पथका
खंदा शिपाई क्रांऽऽतीचा कामगार किसान ॥ १ ॥

लागे कुणाला कष्टावें । थंडीत वाऱ्यांत
कोणी उपाशीं रावावें । श्रीमंत सेवेंत
कोणी ऽ करीं तरवार । माजे ज्यावरी सरकार
उठा शिपायी क्रांऽऽतीचे कामगार किसान ॥ २ ॥

बेडी सदा दास्यत्वाची । पायीं कुणाच्या ही
करवंटी भिक्षांदेहीची । हातीं कुणाच्या ही
मग कां धनिक वचना । भुलुनी वरिसी मरणा
दिक्षा अता घे क्रांऽऽतीची कामगार किसान ॥ ३ ॥

जों ही जुटीची ऐक्याची । आहे खडी भिंत
जंग ही स्वातंत्र्याची । जिंकाल निश्चित
हल्ला करुनि जुटिचा । धुव्वा उडवूं अरिचा
मोर्चा पुढें न्या क्रांऽऽतीचा कामगार किसान ॥ ४ ॥

घ्या आण ही स्वातंत्र्याची । या लाल झेंड्याची
आहे कसोटी शक्तीची । तुमच्या चिकाटीची
हाणा जुलमी दहशत् । स्थापा मजुर हुकूमत्
बोला कि जयजय क्रांऽऽतीचा कामगार किसान ॥ ५ ॥

# प्यारे हल चलाये जा

ऐ किसान गाये जा, प्यारे हल चलाये जा ।
घर उजाड है तो क्या, देशको सजाये जा ॥ ऐ किसान
ह्ाल हूं बहाये जा, फूलफल उगाये जा
दूसरोंके वास्ते अपना सुख भुलाये जा
ऐ किसान— ॥ १ ॥

धूप आज तेज है, तुझे खबर है कहाँ
चल रही है लूं चले, तुझको इसकी पर्वा क्या ।
सब है अपने घरमें हो, हाय तेरा घर कहाँ
ऐ किसान— ॥ २ ॥

जालिमोंने तेरा सब, सुख भुला दिया तो क्या
तेरे आंसुओंपे गर मुस्करा दिया तो क्या ।
तरी आह आहपर, वाह वाह किया तो क्या ।
ऐ किसान— ॥ ३ ॥

सब्र करकी एक रोज, तू मुराद पायेगा
अपनी फतह मन्दगीकी, जल्द दाद पायेगा ।
पायेगा हरेकके दिलमे, अपनी याद पायेगा ।
ऐ किसान— ॥ ४ ॥

फिर ये जुल्मके खुदा, खुदहि सर झुकायेंगे
वरना तेरे सामने, खुदको मिटता पायेंगे ।
जिस तरहसे होगा सब, तेरे गीत गायेंगे
ऐ किसान— ॥ ५ ॥

प्यारे तेरा खून यूँ, रायेगा न जायेगा
दुष्मनोंके माथेपर, खुलके रंग लायेगा ।
भेट सुर्ख फूलकी, मुल्कपर चढ़ायेगा
ऐ किसान— ॥ ६ ॥

हुर्रियलके देवताको, अब हिजाब आगया
देख सुबह होगयी, आप ताब आगया ।
इन्कलाब आगया, इन्कलाब आगया
ऐ किसान— ॥ ७ ॥

# जंगे आज़ादी

ऐ मेहनत कश उठ होशमें आ
हात मे झंडा लाल उठा
जुल्मका नाम निशान मिटा।
उठ होशमे आ बेदार हो जा ॥ १ ॥
यह झंडा है मज़दूरोका,
मजबूरोंका महकूमोंका।
महरूमोका मुजलिमोंका
उठ होशमे आ बेदार हो जा ॥ २ ॥
एक नया जंग है शुरुं हुआ
कीसानों का मज़दूरों का
यह जंग है जंगे आजादी।
उठ होषमे आ बेदार हो जा ॥ ३ ॥
चल बांध कमर, तैयार हो जा
उठ छोड़ नींद, हुशयार हो जा।
हुशयार हो जा हुशयार हो जा।
उठ होशमे आ बेदार हो जा ॥ ४ ॥
यह झंडा तुझसे कहता है
दिनरात जुल्म क्यौं सहता है।
खामाश सदा क्यों रहता है।
उठ होशमे आं बेदार हो जा ॥ ५ ॥

# ★ लेनिन का वरदान ★

हमारा प्यारा लाल निशान
लेनिन का वरदान ॥ ध्रु० ॥

आवो दुनियाके मज्दूरो
आवो भूके प्यासे शूरो ।
आवो सब हम मिलकर गावो
इन्कलाब का गान ॥ १ ॥

यह हम लोगोंकी ताकत है,
यह हम लोगोंकी इज्जत है
यह हम लोगोंकी हिम्मत है,
हम लोगोंकी शान ॥ २ ॥

संभालो संभालो पुंजीशाही
इन्कलाब के हम है राही ।
अपना हक् पानेकी टोली
है हम लाल जवान् ॥ ३ ॥

आज घडी आगई तुम्हारी
करलो मिटने की तैय्यारी ।
मुजलीमोंकी लढने टोली
आ पहुंची मैदान ॥ ४ ॥

बढी कदमसे कदम मिलाकर
शोषण की बुनियाद हिलाकर
भाईयों यह जंग है आखीर
हो आझाद जवान ॥ ५ ॥
हमारा प्यारा लाल निशान ॥

## ❀ हिंद तुझे आज़ाद करेंगे ❀

आझाद करेंगे हिंद तुझे आझाद ।। धृ० ।।

हम् हिंदी है और कुछ भी नही
और कुछ भी नही गर हिंदी नही
यह हिंद रहे आबाद–आबाद–आबाद ।। धृ०।।
आज़ाद करेंगे हिंद तुझे आज़ाद

आपसकी लढाई मिटा देंगे
अग्यानका पडदा हटादेंगे
सब मिलके रहेंगे शाद–शाद–शाद–
आज़ाद करेंगे हिंद तुझे आज़ाद

कहने मे किसीके न आयगें
खुद् समझेंगे समझायेंगे
यह हिंद रहे आझाद–आझाद–आझाद ।। धृ० ।।
आज़ाद करेंगे हिंद तुझे आज़ाद

तकदीर के बंधन तोडेंगे
तदबीरसे मुहं ना मोडेंगे
फर्याद की आदत छोडेंगे
फर्याद – फर्याद – फर्याद ।। धृ० ।।
आज़ाद करेंगे हिंद तुझे आज़ाद

# भव स्वतंत्रता का गान

उठो जागो मूके बंदी
अब खींचो लाल तरवार
कबतक सहोगे भाई
जालीम का अत्याचार ।। १ ।।

तुम्हारे रक्तसे रंजित कंदन
दशदीश लाया रंग
अब सौ बरस का बंधन
एकसाथ करेंगे भंग ।। २ ।।

यह अंतिम जंग है जिनका
जितेंगे हम एकसाथ
गावो ' इंटर नॅशनल '
भव स्वतंत्रता का गान

REFBK-0006419
REFBK-0006419

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

समाप्त

मुद्रकः—द. रानडे
प्रोप्रायटर, आशा मुद्रण, अमरावती.